ePaper

**तर राजीनामा देईन", विखे-पाटलांच्या मागणीवर भुजबळांचं उत्तर**



| वर्ष - 7 | अंक - 202 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 30 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- विल्यम्सनचे विक्रमी 29 वे शतक
- रुबिना दिलैक होणार आई
- चीनमध्ये न्युमोनियाचा प्रादुर्भाव वाढला!
- आम्ही साधू-संत नाही : अजित पवार


# 'नवभारत साक्षरता'ला मिळेना मुहूर्त!



## अध्यादेशानंतरही शिक्षकांची योजनेला नापसंती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नवभारत साक्षरता मोहिमेला शिक्षकांचा अद्यापही विरोध कायम आहे. अतिरिक्त काम दिल्याने नाराजी दर्शवत प्राथमिक शिक्षकांनी या योजनेच्या कामाकडे दुर्लक्ष केले आहे. योजना राबविण्याचा अध्यादेश प्रसिद्ध होऊन तीन महिने लोटले आहे. मात्र शिक्षकांची मनधरणी करण्यात अद्याप शासनाला यश आलेले नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात ही योजना सक्षमपणे राबविण्याला मुहूर्त मिळत नसल्याचे चित्र आहे.**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शिक्षकांना निवडणूक आणि जनगणना वगळता अन्य शालाबाह्य कामे देता येत नसल्याची तरतूद शिक्षण हक्क कायद्यात आहे. तसेच अशैक्षणिक कामांमुळे अध्यापनाला वेळ मिळत नसल्याने निरक्षर सर्वेक्षणाचे काम शिक्षकांकडून करून घेण्यात येऊ नये, असे निवेदन प्राथमिक शिक्षकांच्या विविध संघटनांकडून शिक्षण संचालनालयाच्या योजना विभागाचे संचालक महेश पालकर यांना देण्यात आले होते. निरक्षरांना साक्षर करणे आवश्यक असल्याने शिक्षकांनी या कामी सहकार्य करण्याचे आवाहन पालकर यांनी परिपत्रकाद्वारे केले होते.

मात्र शिक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद न देता या कामावर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली. पिंपरी-चिंचवड महापालिकेअंतर्गत 982 प्राथमिक शिक्षकांचा समावेश होत आहे. या शिक्षकांनी देखील या योजनेविषयी नाराजीच व्यक्त केली आहे. राज्यासह शहरात प्राथमिक शिक्षकांपाठोपाठ आता माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत सुरू करण्यात आलेल्या निरक्षरांच्या सर्वेक्षणावर बहिष्कार घातला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाने शिक्षण विभागाला निवेदन देऊन माध्यमिक शिक्षकांना सर्वेक्षणाच्या कामातून वगळण्याची मागणी केली आहे. माध्यमिक शिक्षकांना यातून न वगळल्यास बहिष्कार घालण्याची भूमिका निवेदनात स्पष्ट करण्यात आली आहे.

> "शासनाच्या स्तरावर चर्चा सुरू आहेत. मात्र संघटनेचे राज्य पदाधिकारी जी भूमिका घेतील तीच आमची आहे. शिक्षकांना अतिरिक्त कामे नको अशी संघटनेची भूमिका आहे. मात्र शासनाकडून हे नवीन काम दिले आहे. त्याला शिक्षकांचा विरोध आहे.
> - संजय येणारे, अध्यक्ष.
> अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड प्राथमिक शिक्षक संघ.

# उद्यानांची दुरावस्था, अधिका-यांचे दुर्लक्ष!

## खासदार श्रीरंग बारणे : केवळ फोटोशूटसाठी उद्यानांचा वापर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**थेरगावातील लक्ष्मीबाई बारणे उद्यान, केजूदेवी बोट क्लब, खिंवसरा पाटील जलतरण तलावाची दुरावस्था झाली आहे. साहित्य अस्ताव्यस्थ पडले. ठेकेदार केवळ बीले उकाळण्याचे काम करत असून उद्यान विभागप्रमुखांचे दुर्लक्ष आहे. ठेकेदारकडील काम काढून महापालिकेने उद्यान चालविण्याची मागणी करत उद्यानांचा नागरिकांना फिरण्यासाठी नव्हे तर केवळ फोटोशुटसाठी उद्यान देऊन पैसे कमविले जात असल्याचा आरोप शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केला.**



खासदार बारणे यांनी अधिका-यांसह थेरगावातील उद्यान, तलावाची पाहणी केली. अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे-पाटील, सह शहर अभियंता मनोज सेठिया, उद्यान विभागाचे उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेश वसावे आदी उपस्थित होते. थेरगावातील लक्ष्मीबाई बारणे उद्यान, केजूदेवी बोट क्लब, खिंवसरा पाटील जलतरण तलावाची दयनीय अवस्था झाली आहे. ओपन जिमचे साहित्य तुटले आहे. बोट क्लबमध्ये कचरा साचला आहे. नागरिक सातत्याने तक्रारी करत आहेत. परंतु, प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे. ठेकेदार केवळ बिले घेण्यापुरते काम करतात. उद्यान विभागाचे लक्ष्य नाही. फोटोशुटसाठी उद्याने देऊन पैसे कमविण्याचा धंदा चालविला आहे. टवाळखोरांचा धिंगाणा असतो, उद्यानात मद्यप्राशन करत बसलेले असतात. तिथे सुरक्षारक्षक नाहीत. सर्वसामान्य नागरिक उद्यानात जाण्यास घाबरत आहेत. ठेकेदाराकडून काम काढावे आणि महापालिकेने उद्यान चालवावे. रविकिरण घोडके हे केवळ नावापुरते उपायुक्त आहेत. ते कधी उद्यानांमध्ये जात नाहीत. त्यांचे कामावर लक्ष नाही. करोडे रुपये खर्च करुन बनविलेल्या उद्यानांची प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे दुरावस्था झाली आहे. तत्काळ उद्यानांची सुधारणा करावी, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

### अधिका-यांचा मनमानी कारभार

मागील दीड वर्षापासून महापालिकेत नगरसेवक नाहीत. अधिका-यांना जाब विचारण्यासाठी कोण नाही. त्याचा गैरफायदा घेत मनमानी कारभार चालला आहे. याला लगाम घालण्याची आवश्यकता आहे. यासाठी गुरुवारी आयुक्तांना भेटणार असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

# म्हाडा 5863 घरांसाठी 5 डिसेंबरला सोडत

## 59 हजारांहून अधिक अर्जदार सोडतीत होणार सहभागी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**म्हाडाच्या पुणे मंडळाच्या पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली येथील विविध गृहनिर्माण योजनेंतर्गत उभारलेल्या ५८६३ घरांच्या विक्रीसाठी २४ नोव्हेंबर रोजी संगणकीय सोडत काढण्यात येणार होती. मात्र आता ही सोडत प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती.**

अखेर आता पुणे मंडळाने सोडतीची नवी तारीख जाहीर केली असून आता ५ डिसेंबर रोजी पुण्यात सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीत अंदाजे ५९ हजार अर्जदार सहभागी होणार आहेत. पुणे मंडळ क्षेत्रातील ५८६३ घरांच्या सोडतीच्या अर्जविक्री-स्वीकृतीला इच्छुकांनी बऱ्यापैकी प्रतिसाद दिला आहे. अर्जविक्री-स्वीकृतीच्या अंतिम मुदतीत ६० हजार अर्ज दाखल झाले आहेत. यातील अंदाजे ५९ अर्जदार पात्र ठरले आहेत. सोडतीच्या मुळ वेळापत्रकानुसार २४ नोव्हेंबरला सोडत काढण्यात येणार होती. मात्र काही प्रशासकीय कारणाने ही सोडत पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे अर्जदारांची सोडतीची प्रतीक्षा लांबली आहे. पण आता अखेर ही प्रतीक्षा संपली आहे. आता ५ डिसेंबर रोजी सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी अशोक पाटील यांनी दिली. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ही सोडत काढण्याचे नियोजन असून यासाठी अजित पवार यांची वेळ घेण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. म्हाडाच्या पुणे (Pune Mhada) घरांसाठीची सोडत अखेर जाहीर झाली आहे. येत्या 05 डिसेंबर 2023 रोजी संगणकीय सोडतीत विजेत्यांची नावं घोषित केली जातील. गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी




चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली येथील विविध गृहनिर्माण योजनेतील 5863 घरांसाठी लॉटरी जाहीर झाली होती. त्याची संगणकीय सोडत पुणे जिल्हा परिषद सभागृह येथे 05 डिसेंबर 2023 रोजी सकाळी 9 वाजता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत काढण्यात येणार आहे.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे दि. 05 सप्टेंबर, 2023 रोजी सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी आणि अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. या सोडतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून 5863 सदनिकांसाठी सुमारे 60 हजार अर्ज प्राप्त झाले . अधिवास प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वाढीव मुदत मिळण्यासाठी नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार व नागरिकांना सुविधा मिळावी यासाठी मंडळातर्फे सोडतीसाठी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. म्हाडा पुणे मंडळाच्या सोडतीत पुणे जिल्ह्यातील 5425 सदनिका, सोलापूर जिल्ह्यातील 69 सदनिका, सांगली जिल्ह्यातील 32 सदनिका व कोल्हापूर जिल्ह्यातील 337 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या सोडतीत म्हाडा गृहनिर्माण योजनेतील 403 सदनिका, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत 431 सदनिका, 20 टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत 2584 सदनिका व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत 2445 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल, पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अशोक पाटील आदी या सोडतीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. म्हाडा लवकरच घरांच्या किमती कमी करणार आहे.अनेक दिवस म्हाडा लॉटरीतील पडून असलेल्या घरांच्या किंमती कमी होणार असल्याचं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी काही दिवसापूर्वीच सांगितलं होतं. म्हाडाच्या सुमारे 11 हजार घरांच्या किंमती कमी होणार आहेत. संबंधित घरांचं वीज बिल, पाणी पट्टी भरावी लागत असल्यानं म्हाडाच्या वतीनं हा निर्णय घेण्यात आल्याचंही यावेळी मंत्री सावे यांनी सांगितलं. संबंधित घरांचं वीज बिल, पाणी पट्टी यामध्ये म्हाडाचा बराच पैसा खर्च होतो.

### घरांच्या किमती कमी होणार?

» म्हाडा पुणे मंडळाच्या सोडतीत पुणे जिल्ह्यातील 5425 सदनिका, व कोल्हापूर जिल्ह्यातील 337 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत 431 सदनिका, 20 टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत 2584 सदनिका व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत 2445 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा तब्बल 11 हजार घरांची कमी किमती करुन पुन्हा विक्री करण्यात येणार असून नुकसान टाळत महसूल वाढीसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितलं.

# ससूनचे डीन डॉ. संजीव ठाकुरांना पोलीस वाचवत आहेत

## धंगेकरांचे पुणे पोलीस आयुक्त कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**ड्रग माफिया ललित पाटील प्रकरणात (LALIT PATIL DRUG CASE) पुणे पोलिसांनी ससून रुग्णलयातील (SASOON HOSPITAL DRUG CASE) एक कर्मचारी आणि येरवडा कारागृहातील दोन कर्मचाऱ्यांना अटक केलीय, मात्र पोलीस ससूनचे डीन डॉ. संजीव ठाकूर यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाचवत असल्याचा आरोप करत आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुणे पोलीस आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन केलं. ललित पाटील ससून ऐवजी आपल्या सोसायटीत येऊन मुक्कम करायचा असा दावा पुणे कॅम्प भागातील एका सोसायटीतील रहिवाशांनी केल्यानं खळबळ उडालीय.**




ड्रग माफिया ललित पाटील आणि त्याचा साथीदार अभिषेक बलकवडे यांचे एक सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. त्यामध्ये ते निवांतपणे गप्पा मारताना दिसतायत. तो व्हिडीओ पुणे कॅम्प भागातील सेंट्रल पार्क सोसायटीतील आहे. रोझरी स्कुलचा संचालक विनय अरहानचे या सोसायटीत दोन फ्लॅट आहेत. बँकेची फसवणूक केल्याच्या आरोपावरून अटक असलेला विनय अरहाना ससुनमधील वॉर्ड नंबर 16 मधे रहात होता. तिथे त्याची ललित पाटील सोबत ओळख झाली. या ओळखीतून ललित पाटील ससुनमधून निघून अरहानाच्या फ्लॅटवर मुक्कामाला जात होता . विनय अरहानाच्या इथल्या दोन फ्लॅटसाठी सेपरेट एंट्रन्स तयार करण्यात आल्यानं ललित पाटीलला या सोसायटीत बिनबोभाट येता येत होतं. इथूनच तो त्याच ड्रग रॅकेट चालवत असल्याचं पुढं समोर आलं. पण आपल्या सोसायटीत इतका गंभीर प्रकार सुरु आहे याचा या सोसायटीतील रहिवाश्यांना थांगपत्ताही नव्हता. पुणे पोलिसांनी या प्रकरणात ससून रुग्णालयात शिपाई म्हणून काम करणाऱ्या महेंद्र शवतेला अटक केली आहे. महेंद्र शेवते हा ललित पाटील आणि ससूनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील दुवा म्हणून काम करत होता. त्यामुळं ससूनचे माजी डीन डॉक्टर संजीव ठाकूर आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्याकडून पुणे पोलीस आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं. ससून पाठोपाठ या प्रकरणात कारवाईचा बडगा आता येरवडा कारागृहातील प्रशासनावर देखील उगारण्यात आलाय. कारागृहातील कॉन्स्टेबल मोईन शेख आणि कौन्सिलर म्हणून काम करणाऱ्या सुधाकर इंगलेला अटक करण्यात आलीय. मात्र महेंद्र शेवते काय किंवा सुधाकर इंगळे काय, हे तर लहान प्यादे होते. ललित पाटील तीन वर्षं ज्यांच्या आशीर्वादानं ससून रुग्णालयात तळ ठोकून होता आणि ज्यांच्या मदतीनं येरवडा कारागृहातून तो ड्रग तयार करणारा कारखाना उभारू शकला, त्या वरिष्ठांपर्यंत पुणे पोलिसांचा तपास पोहचणार का हा खरा प्रश्न आहे . ही सोसायटी असेल , इथूनच जवळ असलेलं पंचतारांकित हॉटेल असेल किंवा तिथून जवळ असलेला मॉल असो, ललित पाटील या सर्व ठिकाणी अगदी निवांतपणे वावरायचा. अर्थात हे सगळं वरिष्ठांच्या आशीर्वादाशिवाय होणं शक्य नव्हतं. मात्र पुणे पोलीस कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करताना वरिष्ठांना वाचवण्याचा तर प्रयत्न करत नाहीत ना अशी शंका उपस्थित होत आहे.

### ठाकूर यांना केवळ पदमुक्त केले

» अमली पदार्थ तस्कर ललित पाटील प्रकरणाला दोन महिन्यांचा कालावधी झाला आहे. ललित पाटीलकडून कोण कोणती साहित्य, रोख रक्कम किती जप्त केली आहे, याबाबत पोलिसांकडून माहिती दिली जात नाही. ज्या ससून रुग्णालयामधून ललित पाटील पळाला, त्यावेळचे तत्कालीन अधिष्ठाता डॉ संजीव ठाकूर यांना केवळ पदमुक्त केले आहे. तर डॉ. देवकाते यांना बळीचा बकरा बनवत त्यांच्यावर कारवाई केली. काही पोलिस कर्मचाऱ्यांवर देखील कारवाई केली आहे.

# ‘इंद्रायणी’ संवर्धनासाठी ‘रिव्हर सायक्लोथॉन’

## ‘रेकॉर्ड ब्रेक’ उपक्रम : अविरत श्रमदानसह विविध पर्यावरण प्रेमी संस्थांचा सहभाग

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दरवर्षीप्रमाणे याही वर्षी इंद्रायणी स्वच्छता जनजागृती अभियान अंतर्गत ‘रिव्हर सायक्लोथॉन-२०२३’ चे आयोजन केले आहे. या उपक्रमाचे हे आपले ६ वे वर्ष आहे. “आपली इंद्रायणी नदी सर्वांनी प्रदूषित न करता स्वच्छ ठेवावी”. या संकल्पनेवर भर दिला आहे. तसेच, गतवर्षी या उपक्रमाची ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड’मध्ये नोंद झाली आहे.**



पिंपरी-चिंचवडमधील आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित केला असून, प्रतिवर्षी मिळणारा मोठा प्रतिसाद पाहता यावर्षी आपण सायकल बद्दलचे ‘BIGGEST STATIC CHAIN’ हे रेकॉर्ड, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्याचा संकल्प केला आहे. सदर रेकॉर्ड शनिवार, दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता करण्यात येईल. तसेच, रिव्हर सायक्लोथॉन रॅली ही रविवार, दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी सहा वाजता मुख्यत्वे तीन विभागात होणार आहे. पाच किलोमीटर, १५ किलोमीटर आणि २५ किलोमीटर असे हे विभाग आहेत. या रॅलीसाठी २५ हजारपेक्षा जास्त सायकलिस्ट येतील असा अंदाज आहे, असा दावा आयोजकांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

यावेळी रिव्हर सायक्लोथॉनचे मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे आणि सचिन लांडगे, अविरत श्रमदानचे दिगंबर जोशी, डॉ. आनंद पिसे, सचिन मरगज, सायकल मित्र पुणेचे बापू शिंदे, संतोष गाढवे, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनचे बापू गायकवाड, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे बापू बांगर, वाहतूक विभागाचे श्री. साळुंखे, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे भारतातील समन्वयक मिलिंद वेर्लेकर तसेच इतर सामाजिक संस्थातर्फे डब्ल्युटीई इन्फ्रा चे विवेक जोशी, आयआयबीचे अॅड. लोहारे, रोटरी क्लब ऑफ उद्योग नगरीचे प्रेसिडेंट विवेक येवले, लायन्स क्लब ऑफ भोजापुर गोल्डचे प्रेसिडेंट डॉ. गायकवाड उपस्थित होते.

### पिंपरी-चिंचवड पोलीस करणार सारथ्य...

» यावर्षीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे रॅलीचे सारथ्य पिंपरी-चिंचवडच्या पोलीस विभागाकडून करण्यात येणार आहे. तसेच, पोलीस विभागाकडून लोकांनी रहदारीचे नियम काटेकोर पाळण्याचे आवाहनसुद्धा या रॅलीद्वारे करणार आहेत. प्रत्येक आठवड्याचा सोमवार हा ‘हॉर्न फ्री’ म्हणजेच हॉर्न न वाजवता कसा घालवता येईल म्हणजेच ध्वनी प्रदूषण सुद्धा टाळता येईल आणि प्रत्येक आठवड्याचा बुधवार हा सायकल दिवस म्हणून पाळला जावा म्हणजे हवेचे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल व आरोग्य सुधारेल याचा प्रयत्न करण्याचे आवाहन पोलीस विभाग करणार आहे. अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेश दादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड नगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस विभाग आणि इतर पर्यावरण प्रेमी संस्थांनी पुढाकार घेतला आहे. या दोन्ही कार्यक्रमांची माहिती व इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान याबद्दलची माहिती पिंपरी-चिंचवड परिसरातील सर्व शाळा आणि हाउसिंग सोसायटी यांना भेट देऊन दिलेली आहे, असेही आयोजकांनी सांगितले.

# इंद्रायणीनगरमधून आठशे महिलांना अक्कलकोट दर्शन!

## आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

### माजी नगरसेविका नम्रता लोंढे, योगेश लोंढे यांचा पुढाकार



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘तुझं आहे तुजपाशी परी तू जागा चुकल्याशी, या युक्तिप्रमाणे उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा योग्य वापर करून उच्च ध्येय गाठावे. आपल्या जीवनात यश मिळवायचे असेल, तर अविरत संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे. तरुणांनी स्व:त्व जाणावे. शिक्षण, ज्ञान या शिवाय यश नाही. स्वतः मधले वेगळेपण शोधून स्वतःचे अस्तित्व निर्माण केले पाहिजे, असे मार्गदर्शन प्रा. गणेश शिंदे यांनी केले.**

त्रिपुरारी पोर्णिमेच्या शुभ मुहुर्तावर इंद्रायणीनगर, भोसरी येथील नागरिकांना अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन मिळाले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे यांच्या पुढाकाराने आठशे महिलांना घेऊन ही दर्शन यात्रा काढण्यात आली.

भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी समर्थांचे दर्शन भेटल्याने प्रभागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. बुधवारीदि. 29) सकाळी बसची पूजा करुन दर्शन यात्रा सुरू करण्यात आली. यावेळी माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे आदींसह प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसार्मित्त भोसरी विधानसभा मतदारसंघात विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडात्मकसह नागरिकांच्या उपयोगी कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. क्रिकेट स्पर्धा, महिलांसाठी खेळ पैठणीचा कार्यक्रम, पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी रिव्हर सायक्लोथॉन यासह बैलगाडा शर्यत आदींसह विविध कार्यक्रम सध्या मतदारसंघाबरोबरच ग्रामीण भागात देखील आयोजित केले जात आहेत. याचे निमित्त साधत लोंढे दाम्पत्यांनी श्री स्वामी समर्थ दर्शनाचे आयोजन केले होते.

आपल्या मार्गदर्शक नेत्यांचा वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता नागरिकांना समाधान मिळेल, असा उपक्रम आयोजित करण्याच्या उद्देशाने माजी नगरसेविका नम्रता लोंढे आणि सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे यांनी दर्शन यात्रेचे आयोजन केले. प्रभागातील सुमारे आठशे महिलांना अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घडविले.

त्यामध्ये महिलांनी देखील उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. अक्कलकोट येथील अन्नछत्र येथे सर्व महिलांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. अन्नछत्रचे विश्वस्त अध्यक्ष अमोलराजे जन्मेयराजे भोसले यांनी स्वागत करून सन्मान केला.\

तसेच अक्कलकोट शहराचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी या वेळी उपस्थित होते. या दर्शन यात्रेनंतर समाधानाची भावना महिलांनी व्यक्त केली.

> “ आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसाचे निमित्त आम्ही श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शन यात्रेचे आयोजन केले होते. त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी स्वामींचे दर्शन प्रत्येक महिलेला घडविले हे आम्ही आमचे भाग्य समजतो. अनावश्यक खर्च टाळून महिलांना आणि ज्येष्ठांना अपेक्षित असणारे कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. त्या उद्देशानेच या यात्रेचे आयोजन केले.
>
> - **नम्रता लोंढे,** माजी नगरसेविका.




**संघ विचारांचा इतिहास स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच मनुवादी, जातीयवादी, स्त्रीविरोधी, लोकशाहीविरोधी आहे. राहुल गांधींच्या एका शब्दावरून गदारोळ सुरू आहे, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांची आजवरची वक्तव्ये पाहता भाजपच्या परंपरेविषयी अनेक प्रश्न पडतात. 'पहिली बाजू' सदरातील 'हा दोष राहुल गांधींच्या परंपरेचा!' या लेखाचा ('लोकसत्ता'- २८ नोव्हेंबर) प्रतिवाद करणारे टिपण..**

# ..तर मग भाजपच्या 'परंपरे'चे काय?



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख 'पनवती' असा करणे हे सरंजामशाहीचे उदाहरण आहे, असा उल्लेख उपरोल्लेखित लेखात आहे. मात्र विश्वचषकाच्या अंतिम सामन्याच्या एक दिवस आधीच 'एक्स' या समाजमाध्यमावर 'पनवती' हा हॅशटॅग ट्रेंड होऊ लागला होता.

हे जगभरातील भारतीयांच्या भावनांचे प्रकटीकरण होते. त्याच्याशी राहुल गांधी किंवा काँग्रेसचा कोणताही संबंध नाही. ज्या दिवशी भारताचा पराभव झाला, त्या दिवशी व्हॉट्सअॅप, फेसबुक, एक्स, इन्स्टाग्राम या समाजमाध्यमांवर हा हॅशटॅग वापरण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले. हा हॅशटॅग आणखी काही काळ ट्रेंड होत राहिला आणि सर्वसामान्य जनताही पंतप्रधान मोदींसाठी हेच टोपणनाव वापरू लागली, तर निवडणुकांच्या मुहूर्तावर पक्षाचे फार मोठे नुकसान होईल, अशी भीती भाजपमध्ये पसरली. त्यातून राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजप आयटी सेलचे संदेश फिरू लागले. भारतीय संघ जर अंतिम सामना जिंकला असता तर निवडणुका असलेल्या राज्यांमध्ये नरेंद्र मोदी यांच्यासह भारतीय संघातील सर्व खेळाडूंची मिरवणूक काढण्याचा भाजपचा मनसुबा होता. त्यासाठी लाखो बॅनर आधीच छापून तयार ठेवले असल्याच्या बातम्याही नंतर पुढे आल्या. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत पुलवामात शहीद झालेल्या आपल्या जवानांचे फोटो बॅनरवर लावून मते मागण्यात आली होती. आपल्या शूर जवानांविषयी निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेवर स्वार होत सत्ता मिळविल्याचे या देशाने पाहिले होते. हे झाले विश्वचषक अंतिम सामना आणि त्यानंतर 'पनवती' या शब्दावरून सुरू असलेल्या वादाविषयी. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी आणि अन्य भाजप नेत्यांच्या आजवरच्या भाषेचाही आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. नरेंद्र मोदी यांनी एका माजी पंतप्रधानाच्या पत्नीचा उल्लेख 'काँग्रेस की विधवा' अशा शब्दांत केला होता. असे संबोधताना मोदी यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परंपरांचा जागतिक सन्मान केला होता, असे आम्ही समजावे का? 'काँग्रेस की जर्सी गाय' हे संबोधन कोणती विचारसरणी दर्शविते? देशाच्या खासदाराच्या पत्नीला '५० करोडम् की गर्लफ्रेंड' म्हटले जाते, तेव्हा ते कोणत्या स्वरूपाच्या संस्कारांचे द्योतक समजावे? पश्चिम बंगालमध्ये जाऊन तेथील महिला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा उल्लेख जाहीर सभेत 'दिदी ओ दिदी' असा करणे आणि तोही पंतप्रधानपदी विराजमान व्यक्तीने करणे हे कशाचे द्योतक आहे? देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी कोणत्या स्तराची भाषा नरेंद्र मोदी वापरतात? माजी पंतप्रधान मनमोहन सिंह यांची 'बाथरूम में रेनकोट पहनकर नहाते है' अशी खिल्ली उडविली गेली. असे शब्द वापरताना पंतप्रधान देशापुढे नेमके कोणते उदाहरण ठेवतात? संसदेत खासदार राहुल गांधी आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांचे भाषण सुरू असताना जाणीवपूर्वक माइक बंद केला गेला. कॅमेरा अन्यत्र वळविला गेला. भर संसदेत एक खासदार आपल्या सहकारी खासदाराला त्याच्या धार्मिक ओळखीवरून तुच्छ लेखतो, ही कोणती सभ्यता? भाजपचे रमेश बिधुरी संसदेतील चर्चेदरम्यान बसपाच्या दानीश अलींची संभावना अत्यंत गलिच्छ- धर्मवाचक शब्दांत करत असताना मात्र बिधुरी हे हिरोच असल्याप्रमाणे त्यांचा माइक सुरू राहतो आणि कॅमेरा त्यांच्यावरच असतो. ते अत्यंत हीन दर्जाची भाषा वापरतात आणि आपल्याच पक्षाच्या या खासदाराच्या अशा भाषेविषयी पंतप्रधान काहीही बोलत नाहीत.. देशाने हे सारे घडताना पाहिले आहे. संसदेने असंसदीय शब्दांची एक पुस्तिका छापलेली आहे. त्यात बिधुरी यांनी उच्चारलेले शब्द नाहीत किंवा काय याचा शोध घेणे गरजेचे आहे. 'पनवती' शब्दावरून देशाच्या ७५ वर्षांच्या इतिहासात कोठेही साधी अदखलपात्र तक्रारीचीही नोंद नाही. तरीही एवढे आकांडतांडव? पंतप्रधान नरेंद्र मोदींवर लोकशाही मार्गाने टीका केली.

## संपादकीय »

### संकटामागचे सत्य!

***ऑस्ट्रेलियाकडून विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत पराभूत झाल्यामुळे निर्माण झालेल्या राष्ट्रीय दु:खावर उत्तराखंडातील बोगद्यात १७ दिवस अडकलेल्या कामगारांची यशस्वी सुटका हा उतारा होता.***

ऑस्ट्रेलियाकडून विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत पराभूत झाल्यामुळे निर्माण झालेल्या राष्ट्रीय दु:खावर उत्तराखंडातील बोगद्यात १७ दिवस अडकलेल्या कामगारांची यशस्वी सुटका हा उतारा होता. या सुटकेत महत्त्वाची भूमिका बजावणारे, अथक प्रयत्न करणारे आणि यशाचा मार्ग दाखवणारे तंत्रज्ञ अर्नाल्ड डिक्स हे ऑस्ट्रेलियाचेच असावेत हा विचित्र योगायोग. या डिक्स यांच्या जोडीला विविध सरकारी उपक्रमांस आणि उपकरणांस मुन्ना कुरेशी, फिरोज, रशीद, इर्शाद, नसीम, नसीर, अंकुर, जतीन, सौरभ, वकील, हसन, देवंदर अशा झारखंड, बिहार आदी राज्यांतील गरीब, आदिवासी उपेक्षित कामगारांची साथ निर्णायक ठरली आणि जवळपास ४०० तास अंधारबोगद्यात खितपत पडलेल्या कामगारांस अखेर मोकळा श्वास घेता आला.

**भाजप सत्तेवर आला तर राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यामधल्या शेतकऱ्यांना हमीभाव वाढवून दिला जाईल असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले आहे. मग इतर राज्यांमधल्या शेतकऱ्यांचे काय? निवडणुकांच्या काळात जनतेला दिल्या गेलेल्या आश्वासनांना काही अर्थ नसतो असे अनेकदा म्हटले जाते. पण निदान विधानसभेच्या निवडणुकीच्या संदर्भात हे पूर्णत: खरे नाही असे अलीकडच्या काळात दिसते आहे.**

# मोदी; पंतप्रधान आणि भाजप नेते!



आश्वासने खरोखरच विकासाला चालना देणारी असतात की ती केवळ जनानुरंजक असतात वगैरे चर्चा आपण करू शकतो. पण त्यातील बरीच आश्वासने पूर्ण होताना आपल्याला दिसताहेत. आणि म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'मोदी ग्यारंटी' या लेबलखाली दिलेले आश्वासन गंभीरपणे घ्यावे लागेल. हे आश्वासन शेतीमालाच्या हमीभावासंदर्भात आहे. केंद्र सरकार गहू आणि तांदळाची खरेदी ज्या हमीभावाने करते त्यापेक्षा अनुक्रमे २० ते ३० टक्के जास्त दराने ही खरेदी छत्तीसगड, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांत भाजप सत्तेवर आला तर तेथील सरकारे करतील असे आश्वासन पंतप्रधानांनी दिले आहे. अशा प्रकारची आश्वासने काँग्रेसनेदेखील दिली आहेत, पण काँग्रेस केंद्रात सत्तेवर नाही त्यामुळे त्यांच्या घोषणेचा केंद्र सरकारच्या धोरणाशी काही संबंध नाही. त्यांचे उत्तरदायित्व फक्त विशिष्ट राज्यांतील शेतकऱ्यांशी आहे, अशी भूमिका तो पक्ष घेऊ शकतो. पण भाजपचे तसे नाही कारण हा पक्ष देशात केंद्रात सत्तेवर आहे. शेतकरी संघटनेच्या काही नेत्यांच्या मते देशाच्या पंतप्रधानांनी फक्त काही विशिष्ट राज्यांतील शेतकऱ्यांना असे आश्वासन देणे चुकीचे आहे. कारण पंतप्रधान सगळ्या देशाचे असतात. तेव्हा त्यांनी असा पक्षपात करणे चुकीचे आहे. अर्थात याला भाजप किंवा मोदींकडून असे उत्तर मिळू शकते की हे आश्वासन मोदींनी दिले असले तरी हे आश्वासन ते देशाचे पंतप्रधान म्हणून देत नव्हते. हे आश्वासन ते भाजपचे सर्वोच्च नेते म्हणून देत होते. तो म्हणजे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले तेव्हा मध्य प्रदेश सरकार अशाच प्रकारची योजना राबवत होते. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या हमीभावाच्या वर काही प्रति किलो रक्कम बोनस रूपात मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना मिळत होती. म्हणजे हमीभावाची रक्कम केंद्र सरकार द्यायचे आणि बोनसची रक्कम शेतकऱ्यांना राज्याच्या तिजोरीतून मिळायची. पण सत्तेवर आल्यावर नरेंद्र मोदींनी मध्य प्रदेश सरकारला ही योजना बंद करण्यास भाग पाडले. त्यांची त्या वेळची भूमिका अशी होती की या बोनसमुळे शेतकऱ्यांना अधिक धान्य उत्पादन करायला प्रोत्साहन मिळते आणि हे वाढलेले उत्पादन केंद्राला हमीभावाने घ्यावे लागते. हा केंद्र सरकारला सोसावा लागणारा खर्च राज्य सरकारच्या हमीभावाच्या वर द्याव्या लागणाऱ्या बोनसमुळे आहे. मोदी सरकारची भूमिका तर्कशुद्ध होती. पण मग आता नरेंद्र मोदी भाजपचे नेते म्हणून बोनस देण्याची घोषणा करत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आम्ही साधू-संत नाही : अजित पवार

## अनेक वर्षे अनेक सरकारमध्ये आम्ही काम केलं

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची निर्धार रॅली कर्जत येथे आयोजित करण्यात आली. यावेळी अजित पवारांचं जंगी स्वागत करण्यात आलं. गेल्या अनेक दिवसांपासून अजित पवार डेंग्यु झाल्यामुळे माध्यमांपासून लांब होते. परंतु, गेल्या दोन तीन दिवसांपासून ते पुन्हा राजकारणात सक्रिय झाले असून आज त्यांनी कर्जत येथे जाहीर सभाही झाली. यावेळी त्यांनी वेगळी भूमिका घेण्यामागचं कारणही विषद केलं.**

अजित पवार म्हणाले की, मधल्या काळात काही राजकीय बदल झाले. त्याबाबत बराच उहापोह झाला. सगळ्यांना सांगायचं आहे की, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आणि शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या विचारांवर चालणारा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. या जिल्ह्यात समुद्रकिनारा आहे. डोंगराळ भाग आहे. नागरिकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. रेल्वे गेली आहे. रस्त्यांचं जाळं निर्माण झालं आहे. पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचं विमानतळ व्हावं. अनेक महत्वाच्या भागांना जोडणारं काम होत आहे. पुणे, नगर जिल्ह्यांतून घाटातून येताना लोकांना त्रास होतो. तेथेही काही व्यवस्था करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. इथल्या लोकांना रोजगार निर्माण झाला पाहिजे. "आम्ही राजकारणात ३०-३५ वर्षे काम करत आहोत. पर्यटनाला चालना दिली तर सर्वाधिक रोज स्थानिकांना मिळतो. प्रत्येकाच्या रोजीरोटीचा प्रश्न आहे. गेल्या साडेनऊ वर्षांत भारताच्या



जनतेसाठी योजना जाहीर केल्या आहेत. या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहोत", असंही अजित पवार म्हणाले. "काहीजण विचार करत असतील की ही भूमिका का घेतली? आम्ही साधू संत नाही. अनेक वर्षे अनेक सरकारमध्ये आम्ही काम केलं. अनेक राजकीय पक्ष वेगवेगळ्या सहकाऱ्यांसोबत जातात. परंतु, आपली विचारधारा सोडत नाहीत. या निर्धार सभेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या जनतेलाही सांगतो की, आमची विचारधारा स्पष्ट आहे. अल्पसंख्याक, मागासवर्गीय आदिवासी समाज असेल, सर्वसाधारण समाज असेल कोणत्याही समाजाला आपआपल्या समाजात एकोपा राहावा ही भूमिका युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराजांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी घेतली होती. आणि स्वराज्याची स्थापना केली. त्याच रस्त्याने आमच्या सगळ्यांच्या जाण्याचा प्रयत्न आहे, असंही अजित पवार म्हणाले. अजित पवार म्हणाले की, मधल्या काळात काही राजकीय बदल झाले. त्याबाबत बराच उहापोह झाला. सगळ्यांना सांगायचं आहे की, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आणि शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या विचारांवर चालणारा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. या जिल्ह्यात समुद्रकिनारा आहे. डोंगराळ भाग आहे. नागरिकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. रेल्वे गेली आहे. रस्त्यांचं जाळं निर्माण झालं आहे. पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचं विमानतळ व्हावं. अनेक महत्वाच्या भागांना जोडणारं काम होत आहे.

### आमची विचारधारा स्पष्ट

» या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहोत", असंही अजित पवार म्हणाले. "काहीजण विचार करत असतील की ही भूमिका का घेतली? आम्ही साधू संत नाही. अनेक वर्षे अनेक सरकारमध्ये आम्ही काम केलं. अनेक राजकीय पक्ष वेगवेगळ्या सहकाऱ्यांसोबत जातात. परंतु, आपली विचारधारा सोडत नाहीत. या निर्धार सभेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या जनतेलाही सांगतो की, आमची विचारधारा स्पष्ट आहे. अल्पसंख्याक, मागासवर्गीय आदिवासी समाज असेल, सर्वसाधारण समाज असेल कोणत्याही समाजाला आपआपल्या समाजात एकोपा राहावा ही भूमिका युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराजांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी घेतली होती. आणि स्वराज्याची स्थापना केली. त्याच रस्त्याने आमच्या सगळ्यांच्या जाण्याचा प्रयत्न आहे, असंही अजित पवार म्हणाले. अजित पवार म्हणाले की, मधल्या काळात काही राजकीय बदल झाले. त्याबाबत बराच उहापोह झाला. सगळ्यांना सांगायचं आहे की, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आणि शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या विचारांवर चालणारा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे.

# तर मग तुमच्याबद्दल लोकांमध्ये संभ्रम निर्माण होईल

## ओबीसी एल्गार सभेवरून बच्चू कडूंचा भुजबळ-वडेट्टीवारांना टोला

**। हिंगोली ।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यात संघर्ष चालू आहे. मनोज जरांगे यांच्या मागणीनंतर राज्य सरकारने कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबाना प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. तसेच निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या नेतृत्वातील समिती मराठा आरक्षणासाठी काम करत आहे. परंतु, भुजबळ यांनी ही समिती रद्द करण्याची मागणी केली आहे.**

तसेच मराठा कुटुंबांना कुणबी प्रमाणपत्र देणं थांबवावं अशी मागणीदेखील केली आहे. यावरून त्यांच्यावर टीका होत आहे. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीदेखील भुजबळांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त



केली आहे. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, ओबीसींबाबतची भूमिका मांडायची असेल तर छगन भुजबळ यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यायला हवा. अन्यथा त्यांच्याबाबत वेगळी भूमिका घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी विचार केला पाहिजे. विखे पाटलांच्या या वक्तव्यावर आमदार बच्चू कडू यांनी काही वेळापूर्वी प्रतिक्रिया दिली आहे. आमदार बच्चू कडू छगन भुजबळ यांना उद्देशून म्हणाले, "तुम्ही मंत्रिमंडळात असताना असे आरोप करत असाल तर मग तुमच्याबद्दल लोकांमध्ये संभ्रम निर्माण होईल. भुजबळांच्या सभेला विधानसभेचे विरोधी पक्षनेते (विजय वडेट्टीवार) येतात आणि त्याच वेळी भुजबळ हे मंत्रिपदी कायम राहतात. हे जगातलं आठवं आश्चर्य आहे." जालन्याच्या आंबड येथे अलिकडेच ओबीसी एल्गार सभा पार पडली. या सभेला छगन भुजबळ आणि विजय वडेट्टीवार यांनी संबोधित केलं होतं. त्यावरून बच्चू कडू यांनी भुजबळांवर टीका केली आहे. बच्चू कडू म्हणाले, छगन भुजबळ यांना खरंच ओबीसींचं भलं करायचं असेल तर आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. परंतु, मराठ्यांना वेगळं करून भलं होणार नाही. मराठ्यांना ओबीसीत घ्यावंच लागेल.मुळात आता आरक्षणाचा मुद्दाच संपला आहे. मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांचा विषय आहे. प्रत्येक जिल्ह्यांमधील मराठ्यांच्या कुटुंबांची संख्या चार लाख आहे. आठ जिल्हे गुणिले चार लाख म्हणजे ३२ लाख मराठा कुटुंबं असतील. त्यातले अर्धे बाद होतील, मग १६ लाख राहतील. प्रति कुटुंब चार व्यक्ती या हिशेबाने ६४ लाख मराठे असतील. त्यापैकी ३६ लाख लोकांना प्रमाणपत्र मिळालं आहे. उरलेल्या २५ ते ३० लाख लोकांचा विषय बाकी आहे. तुम्ही (छगन भुजबळ) सभा घेत असताना मराठा कुटुंबांना कुणबी प्रमाणपत्र दिली आहेत आणि ते कायदेशीर आहे. त्यास कोणीच अडवू शकत नाही. मी ही गोष्ट मुद्दाम सांगतोय.मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यात संघर्ष चालू आहे. मनोज जरांगे यांच्या मागणीनंतर राज्य सरकारने कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबाना प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. तसेच निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या नेतृत्वातील समिती मराठा आरक्षणासाठी काम करत आहे.

### कुणबी प्रमाणपत्र देणं थांबवा

» मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यात संघर्ष चालू आहे. मनोज जरांगे यांच्या मागणीनंतर राज्य सरकारने कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबाना प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. तसेच निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या नेतृत्वातील समिती मराठा आरक्षणासाठी काम करत आहे. परंतु, भुजबळ यांनी ही समिती रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच मराठा कुटुंबांना कुणबी प्रमाणपत्र देणं थांबवावं अशी मागणीदेखील केली आहे. यावरून त्यांच्यावर टीका होत आहे.

> छगन भुजबळ यांना खरंच ओबीसींचं भलं करायचं असेल तर आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. परंतु, मराठ्यांना वेगळं करून भलं होणार नाही. मराठ्यांना ओबीसीत घ्यावंच लागेल.मुळात आता आरक्षणाचा मुद्दाच संपला आहे. मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांचा विषय आहे. प्रत्येक जिल्ह्यांमधील मराठ्यांच्या कुटुंबांची संख्या चार लाख आहे. आठ जिल्हे गुणिले चार लाख म्हणजे ३२ लाख मराठा कुटुंबं असतील. त्यातले अर्धे बाद होतील, मग १६ लाख राहतील. प्रति कुटुंब चार व्यक्ती या हिशेबाने ६४ लाख मराठे असतील. त्यापैकी ३६ लाख लोकांना प्रमाणपत्र मिळालं आहे. उरलेल्या २५ ते ३० लाख लोकांचा विषय बाकी आहे.
>
> **- बच्चू कडू , आमदार**

# चीनमध्ये न्युमोनियाचा प्रादुर्भाव वाढला!

## » केंद्राने सर्व राज्यांना अलर्ट मोडवर राहण्यास सांगितले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चीनमध्ये आणखी एका रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. न्युमोनियासदृश हा आजार असून यामुळे लहान मुलांना श्वासोच्छवास घेण्यास अडचणी येत आहेत. चीनमध्ये वेगाने हा आजार लहान मुलांमध्ये पसरत असल्याने भारतानेही पूर्वतयारी सुरू केली आहे. तसंच, केंद्राने सर्व राज्यांना अलर्ट मोडवर राहण्यास सांगितले असून अशा आजारांना तोंड देण्यासाठी राज्यपातळीवर उपाययोजना आखण्याचे आदेश देण्यात आले आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



रविवारी केंद्र सरकारने राज्यांना श्वसनाच्या आजाराविरुद्धच्या तयारीचा आढावा घेण्यास सांगितले होते. आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि सध्या कोणताही धोका नाही. परंतु, या रोगावर देखरेख आणि नियंत्रण मिळवण्याकरता उपाययोजना आखण्याचे निर्देश सर्व राज्यांना देण्यात आले. उत्तर चीनमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव सुरू झाला. निदान झालेल्या लहान मुलांमध्ये न्यूमोनियाचे क्लस्टर्स नोंदवले गेले आहेत. हे क्लस्टर्स मायकोप्लाझ्मा न्यूमोनियासारख्या विविध रोगजनकांच्या रक्ताभिसरणाचे असल्याचे येथील अधिकाऱ्यांनी सांगितले होते. परंतु, हा विषाणू कोविड १९ सारखा संसर्गजन्य नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. चमोली, उत्तरकाशी आणि पिथौरागढ हे तीन जिल्हे चीनच्या सीमेलगत आहेत. त्यामुळे उत्तराखंडमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे अशी माहिती एएनआय या वृत्तसंस्थेने दिली आहे. संबंधित जिल्ह्यांमध्ये न्यूमोनिया आणि इन्फ्लूएंझा फ्लूच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी आयसोलेशन बेड/वॉर्ड, ऑक्सिजन बेड, आयसीयू बेड, व्हेंटिलेटर आणि ऑक्सिजन सिलिंडरची पुरेशी व्यवस्था करण्याचे निर्देश राज्यातील सर्व जिल्हा अधिकारी आणि मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे, अशी माहिती आरोग्य सचिवांनी दिली. गंभीर तीव्र श्वसन आजार (SARI) च्या लक्षणांनी ग्रस्त असलेल्या लोकांवर दक्षता ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. जर सामुदायिक स्तरावर SARI प्रकरणांचे क्लस्टरिंग आढळले तर त्यासाठी व्यवस्था करून रोगावर उपचार आणि नियंत्रण मिळवावे, असेही निर्देश देण्यात आले आहेत. राजस्थानच्या वैद्यकीय आणि आरोग्य विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव शुभ्रा सिंह यांनी अधिकाऱ्यांना रोगाच्या प्रतिबंध आणि उपचारांसाठी तीन दिवसांत कृती आराखडा तयार करण्यास सांगितले आहे. परिस्थिती सध्या चिंताजनक नाही असे सांगून त्या पुढे म्हणाल्या की वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी राज्यभरातील संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी पूर्ण दक्षतेने काम केले पाहिजे.

### इन्फ्लूएन्झा टाळण्यासाठी उपाययोजना

» गुजरातच्या आरोग्य विभागाने सर्व रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, मुख्य जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना अशा प्रकारच्या श्वसनाच्या आजारांना तोंड देण्यासाठी त्यांच्या तयारीचे मूल्यांकन करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे जारी केले आहेत. गुजरातचे आरोग्य मंत्री रुषिकेश पटेल म्हणाले की, राज्य आणि केंद्राने कोविड-१९ साथीच्या काळात तयार केलेल्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांना खबरदारीचा उपाय म्हणून बळकट केले जात आहे. कर्नाटकचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री दिनेश गुंडू राव यांनी लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. "मी जनतेला सूचनांचे पालन करण्याची विनंती करतो, काय करावे आणि काय करू नये हे जाणून घ्या आणि इन्फ्लूएन्झा टाळण्यासाठी उपाययोजना करा. लक्षणे आढळल्यास वेळेवर उपचारांसाठी तुमच्या जवळच्या सरकारी रुग्णालयात भेट द्या. मी लोकांना विनंती करतो की घाबरू नका परंतु आवश्यक खबरदारी घ्या", असं त्यांनी X वर लिहिले.

# माझ्या वडिलांनी लोकांचे प्राण वाचवले

## » रॅट मायनर्सचे कुटुंबीय काय म्हणाले?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तरकाशीतल्या बोगद्यातून १७ दिवसांनी ४१ कामगारांची सुखरुप सुटका झाली आहे. या संपूर्ण बचाव मोहिमेत रॅट मायनर्सची भूमिका अत्यंत मोलाची होती. त्यांच्या कामाचं कौतुक होतं आहे. या रॅट मायनर्सना ट्रेंचलेस इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांच्यातर्फे बोलवण्यात आलं होतं. दिल्लीत्या खजूरी या भागात काही रॅट मायनर्स राहतात. त्यांनी रॅट मायनर्सच्या या कामगिरीचं कौतुक केलं आहे.**



दिवाळीच्या दिवशी सकाळी म्हणजेच १२ नोव्हेंबरच्या दिवशी उत्तर काशीमध्ये भूस्खलन झाल्याने बोगद्यात काम करणारे ४१ मजूर त्या ठिकाणी अडकले होते. या सगळ्यांना बाहेर काढण्यासाठी १७ दिवसांची बचाव मोहीम राबवली गेली. या बचाव मोहिमेत एक वेळ अशी आली होती की सगळ्या मशीन्सनी काम करणं बंद केलं होतं. मात्र १२ रॅट मायनर्सच्या टीमने आपला जीव धोक्यात घालून या ४१ कामगारांचे प्राण वाचवले आहेत. याबाबत आता त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचं कौतुक केलं आहे. १२ पैकी सहा रॅट मायनर्स हे दिल्लीतल्या खजूरी या भागात राहतात. तर बाकीचे सहा हे उत्तर प्रदेशातले आहेत. आजतक या चॅनलने आरिफ मुन्ना या रॅट मायनरच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. त्यांच्या कुटुंबाने सांगितलं आरीफ मुन्ना १२ दिवसांपूर्वी बोगद्यात अडकलेल्या मजुरांची सुटका करण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांची तीन मुलं घरी एकटी होती. या दरम्यान आरीफ मुन्ना यांच्या भावाने या तिघांचा सांभाळ केला. आरीफ मुन्ना यांच्या पत्नीचं करोना काळात निधन झालं. आरीफ यांच्या सहकाऱ्यांनीही सांगितलं की ते खूप चांगल्या स्वभावाचे आहेत आणि मदतीला धावून येतात. माझ्या वडिलांनी ४१ मजुरांचे प्राण वाचवले याचा मला मनस्वी आनंद आहे असं आरीफ मुन्ना यांच्या मुलाने सांगितलं. रॅट मायनिंगचं काम करणारे हे मजूर पाइपलाइनसाठी काम करतात. दिल्लीतल्या पाणी विभागासाठी आणि गॅस विभागासाठी पाइपलाईन टाकण्याचं काम हे सगळे करतात. त्यामुळे जमिनीच्या आत भुयार कसं खणायचं? हे त्यांना अवगत आहे. नसीम यांच्या कुटुंबाने सांगितलं नसीम हे ज्या दिवशी बचाव मोहिमेचा भाग झाले तेव्हा त्यांच्या घरी दोन बहिणींचं लग्न होतं. मात्र ते बाजूला ठेवून ते बचाव मोहिमेत सहभागी झाले. आज त्यांच्या कुटुंबासाठी ते हिरो झाले आहेत. नसीम यांचे कुटुंबीय म्हणाले की जे सहा लोक उत्तरकाशीला गेले होते ते अनेकदा एकत्रच काम करतात. कुठलंही संकट असलं तरीही मागे हटत नाहीत. आम्ही सगळे गरीब कुटुंबातले आहोत. आम्हाला कंपनीने बोलवलं. कुणाचे प्राण वाचवणार असतील तर त्यापेक्षा मोठा आनंद कुठला? तोच मोठा आनंद मानून हे सगळे या मोहिमेत सहभागी झाले.

# मैतेई बंडखोर गटाने शस्त्रे टाकली!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

मणिपूरमधील बंडखोरांचा सर्वात जुना सशस्त्र गट युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंटने (यूएनएलएफ) हिंसेचा मार्ग सोडत मुख्यधारेत येण्याचा निर्णय घेतला आहे. संघटनेने आपली शस्त्रं टाकत शांतता करारावर स्वाक्षरी केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्या एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर याबाबतची माहिती दिली आहे. या घटनेचं वर्णन करताना गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे की, आपण हा एक ऐतिहासिक टप्पा ओलांडला आहे. यूएनएलएफने आज नवी दिल्लीत शांतता करारावर स्वाक्षरी केल्यामुळे ईशान्येत कायमस्वरुपी शांतता प्रस्थापित करता येणार आहे. मोदी सरकारच्या प्रयत्नांना मोठं यश मिळालं आहे.

अमित शाह यांनी म्हटलं आहे की, मणिपूर खोऱ्यातील सर्वात जुना सशस्त्र गट यूएनएलएफने हिंसाचाराचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात येण्याचा प्रस्ताव मान्य केला आहे. लोकशाही प्रक्रियेत परतल्याबद्दल मी त्यांचं स्वागत करतो.

शांतता आणि प्रगतीच्या वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देतो. अमित शाह यांनी आणखी एका एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे की, भारत सरकार आणि मणिपूर राज्य सरकारने यूएनएलएफबरोबर शांतता करार पूर्ण केला आहे. हा शांतता कर गेल्या सहा दशकांपासून चालत आलेल्या सशस्त्र आंदोलनाच्या अंताचं आणि नव्या आरंभाचं प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचं सर्वसमावेशक धोरण, सर्वांना बरोबर घेऊन विकास करण्याचा दृष्टीकोन आणि ईशान्य भारतातील तरुणांना उत्तम भविष्य प्रदान करण्याच्या दिशेने उघडलेल्या मोहिमेतलं हे मोठं यश आहे.

# झिम्मा-2 मध्ये सोनाली आणि मृण्मयी का नाहीत?

'झिम्मा' (JHIMMA) या चित्रपटाच्या यशानंतर झिम्मा-2 (JHIMMA 2) हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. झिम्मा-2 या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटानं ओपनिंग-डेला कोट्यवधींची कमाई केली आहे. या चित्रपटाचं कथानक आणि चित्रपटामधील कलाकारांच्या अभिनयाला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. झिम्मा या चित्रपटामध्ये अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि मृण्मयी गोडबोले यांनी देखील काम केलं होतं पण झिम्मा-2 या चित्रपटात या दोघींची भूमिका नाहीयेत. याचं कारण काय आहे? असा प्रश्न हेमंत ढोमेला एका मुलाखतीमध्ये विचारण्यात आला. यावेळी हेमंतनं दिलेल्या उत्तरानं अनेकांचे लक्ष वेधले आहे. हेमंत ढोमेला प्रश्न विचारण्यात आला की, झिम्मा या चित्रपटामध्ये अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि मृण्मयी गोडबोले यांच्या भूमिका होत्या पण या चित्रपटाच्या दुसऱ्या भागात त्या दोघी का नाहीते? या प्रश्नाला हेमंतनं उत्तर दिलं, "झिम्मा चित्रपटात सोनालीनं साकारलेलं पात्र मैथिली आणि मी साकारलेलं पात्र निखिल यांच्या गोष्टीचा शेवट गोड करण्यात आला होता. उगाच मला त्यात ड्रामा क्रिएट करायचा नव्हता. ओढून ताणून मला त्यात हवा भरायची नव्हती. तसेच रमाच्याबाबतीत आम्हाला वाटलं की, ती पहिल्या भागात ती सारखं मुलं व्हावं याबद्दल बोलत असते. त्याचं कनेक्शन देखील तुम्हाला झिम्मा-2 मध्ये दिसेल पण, जर प्रेक्षकांचे प्रेम लाभलं, तर आम्ही झिम्मा-      3 बनवला तर त्यात त्या दिसतील." 'झिम्मा 2' हा चित्रपट रिलीज होऊन पाच दिवस झाली आहेत. अशातच या चित्रपटानं पाच दिवसांमध्ये 6.32 कोटींची कमाई केली आहे. रिलीजच्या पहिल्या दिवशी या चित्रपटानं 0.95 कोटींची कमाई केली. झिम्मा-2 या चित्रपटात सुहास जोशी, सिद्धार्थ चांदेकर, निर्मिती सावंत, क्षिती जोग, सुचित्रा बांदेकर,सयाली संजीव,शिवानी सुर्वे, रिंकू राजगुरु यांनी काम केलं आहे.या चित्रपटाचं दिग्दर्शन हेमंत ढोमेनं केलं आहे. या चित्रपटातील 'मराठी पोरी' हे गाणं सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. या अनेक नेटकरी या गाण्यावर रिल्स तयार करत आहेत.

## रुबिना दिलैक जुळ्या मुलांची आई होणार

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री रुबिना दिलैक (RUBINA DILAIK) प्रेग्नंट असून लवकरच आई होणार आहे. आता अभिनेत्रीने युट्यूबवर एक व्हिडीओ शेअर करत ती जुळ्या मुलांची आई होणार असल्याचा खुलासा केला आहे. तसेच तिने प्रेग्नंसी जर्नीदेखील चाहत्यांसोबत शेअर केली आहे. रुबिनाने एक व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना गुडन्यूज दिली आहे. अभिनेत्रीला एक नव्हे तर दोन बाळ होणार आहेत. अभिनेत्रीने व्हिडीओ शेअर करत लिहिलं आहे,"आम्हाला जुळी मुलं होणार आहेत. आम्हाला जुळी मुलं होणार असल्याचं जेव्हा पहिल्यांदा कळलं तेव्हा आम्हाला मोठा धक्का बसला होता. त्यानंतर काही काळ आम्ही एकमेकांसोबत बोललोदेखील नाही. असं नाही होऊ शकत असं अभिनव म्हणत होता. पण आता डॉक्टरांनी आम्हाला जुळी मुलं होणार असल्याचं सांगितलं आहे". रुबिना पुढे म्हणाली,"प्रेग्नंसीसाठी आम्ही खूप उत्सुक आहोत. आता आमच्याला डबल सरप्राइज मिळणार आहे. जुळी मुलं होणार हे आता आम्ही स्विकारलं आहे. डॉक्टरांनी सुरुवातीला आम्हाला घाबरवलं होतं. पण आता हे दिवस आम्ही खूप एन्जॉय करत आहोत". रुबिनाने काही दिवसांपूर्वी एक खास पोस्ट शेअर करत प्रेग्नंट असल्याची बातमी चाहत्यांना दिली होती. रुबिना तीन महिन्यांची गरोदर असताना तिचा कार अपघात झाला होता. या अपघातानंतर ती खूपच घाबरली होती. तिला आपल्या बाळांची खूप काळजी वाटत होती. रुबिना म्हणते,"प्रेग्नंसीदरम्यान मी जास्तीत जास्त ॲक्टिव्ह राहण्याचा प्रयत्न करते". अभिनेत्रीचं मॅटरनिटी फोटोशूटदेखील चांगलच व्हायरल झालं होतं. रुबिना दिलैक आणि अभिनव शुक्ला हे 2018 मध्ये लग्नबंधनात अडकले आहेत. रुबिना दिलैक ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. 'बिग बॉस 14'मुळे (BIGG BOSS 14) अभिनेत्रीच्या लोकप्रियतेत आणखी वाढ झाली. रुबिना आणि अभिनव लग्नानंतर एकमेकांपासून दूर झाले होते. पण बिग बॉसच्या घरात त्यांना त्यांच्या प्रेमाची पुन्हा जाणीव झाली आणि त्यांनी पुन्हा एकदा एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. आता नव्या पाहुण्याच्या स्वागतासाठी ते सज्ज आहेत. लग्नाच्या पाच वर्षांनी अभिनेत्री आई होणार आहे.

## रणदीप हुड्डा 47 व्या वर्षी अडकणार लग्नबंधनात

बॉलिवूड अभिनेता रणदीप हुड्डा (RANDEEP HOODA) आज गर्लफ्रेंड लिन लैशरामसोबत (LIN LAISHRAM) लग्नबंधनात अडकणार आहे. रणदीपच्या आयुष्याचा नवा अध्याय सुरू होणार असल्याने चाहतेही खूप आनंदी आहेत. मणिपूरध्ये त्यांचा लग्नसोहळा पार पडणार आहे. तर मुंबईत रिसेप्शन असेल. रणदीप आणि लिनच्या लग्नसोहळ्याला दोन्ही कुटुंबातील सदस्य उपस्थित असतील. रणदीप हुड्डा वयाच्या 47 व्या वर्षी लग्नबंधनात अडकणार आहे. मणिपूरमध्ये लग्नबंधनात अडकल्यानंतर मुंबईत रणदीप-लिनच्या लग्नाचं रिसेप्शन आयोजित करण्यात आलं आहे. महाभारतात अर्जुनने राजकुमारी चित्रगंधाबरोबर ज्याठिकाणी लग्न केलं त्याच ठिकाणी रणदीप त्याच्या गर्लफ्रेंडसोबत सात फेरे घेणार आहे. रणदीप-लिनच्या लग्नसोहळ्याला नातेवाईत आणि जवळचे मित्र-मंडळी उपस्थित राहणार आहेत. दोघेही सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असून एकमेकांसोबतचे फोटो ते सोशल मीडियावर शेअर करत असतात. 2021 मध्ये त्यांनी त्यांचं नातं जगजाहीर केलं होतं.

## 'ॲनिमल' सिनेमावर सेन्सॉर बोर्डाची कात्री




बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर आणि रश्मिका मंदाना यांचा 'ॲनिमल' (ANIMAL) हा सिनेमा काही दिवसांपासून चर्चेत आहे. आता या सिनेमासंदर्भात नवी अपडेट समोर आली आहे. रणबीर-रश्मिकाच्या 'ॲनिमल' सिनेमातील इंटीमेट दृश्यांवर सेन्सॉर बोर्डाने कात्री चालवली आहे. रणबीर कपूर आणि रश्मिका मंदाना यांचा 'ॲनिमल' या सिनेमा सध्या चांगलाच चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी या सिनेमाचा टीझर प्रदर्शित झाला होता. टीझरला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे सिनेप्रेमी आता सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. 'ॲनिमल' या सिनेमात रणबीर-रश्मिकाचे अनेक किसिंग सीन्स होते. पण आता सिनेमातील या दृश्यांवर सेन्सॉर बोर्डाने आक्षेप घेतला आहे. रणबीरच्या 'ॲनिमल'ची सध्या सर्वत्र चांगलीच क्रेझ आहे. नुकताच रणबीरने या सिनेमाचा प्री-रिलीज इवेंट आयोजित केला होता. दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील अनेक बड्या कलाकारांनी प्री-रिलीजला आपली उपस्थिती दर्शवली होती. आता सेन्सॉरने 'ॲनिमल' सिनेमाला A सर्टिफिकेट देण्यासोबत काही दृश्य हटवण्याचे निर्देश दिले आहेत.



## अंकिता लोखंडेने केलं प्रेग्नंसीचं नाटक?

'बिग बॉस 17' (BIGG BOSS 17) हा कार्यक्रम सध्या चांगलाच चर्चेत आहे. 'बिग बॉस'च्या (BIGG BOSS) घरात स्पर्धक प्रेग्नंट असल्याची चर्चा पहिल्यांदाच रंगली. अंकिता लोखंडे (ANKITA LOKHANDE) प्रेग्नंट असल्याची चर्चा रंगली होती. पण नंतर तिचे रिपोर्ट्स निगेटिव्ह आल्याचं समोर आलं. आता 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडलेल्या जिग्ना वोराने (JIGNA VORA) अंकिताच्या प्रेग्नंसीचं सत्य सांगितलं आहे. 'बिग बॉस 17'च्या एका भागात अंकिताने विकीला ती प्रेग्नंट असल्याचं सांगितलं. तसेच आपली प्रेग्नंसी टेस्ट झाली असून आंबट पदार्थ खाण्याची इच्छा होत असल्याचंही तिने सांगितलं होतं. पण नंतर तिचे रिपोर्ट्स निगेटिव्ह आल्याचं समोर आलं. या कार्यक्रमातून बाहेर पडल्यानंतर नावेद सोल म्हणाला की,"योग्य दिशेने गोष्टी होत आहेत". पण आता जिग्ना वोरा या कार्यक्रमातून बाहेर पडली असून तिने यासंदर्भात भाष्य केलं आहे". 'बिग बॉस 17' या घरातून बाहेर पडल्यानंतर फिल्मीबीटला दिलेल्या मुलाखतीत जिग्ना वोरा म्हणाली,"अंकिताच्या प्रेग्नंसीची गोष्ट मी आणि रिंकूने खूप गंभीरपणे घेतली होती. आई असल्यामुळे प्रेग्नंसीमध्ये आंबड पदार्थ खाण्याचं मन होणं आणि ते खाणं गरजेचं आहे, असं मला वाटत नाही. हे फक्त हिंदी सिनेमांत पाहायला मिळतं. पण आता 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडल्यानंतर ही स्ट्रॅटर्जी असल्याचं माझ्या लक्षात आलं आहे". जिग्ना वोरा म्हणाल्या,"बिग बॉस 17'च्या घरात सहभागी होण्याआधी सर्व स्पर्धकांची ब्लड टेस्ट झाली होती. त्यामुळे अंकिता जर प्रेग्नंट असती तर ही बाब आधीच लक्षात आली असती. अंकिताने चर्चेत राहण्यासाठी प्रेग्नंसीचं खोटं नाटक केलं आहे". अंकिताचा एक व्हिडीओ काही दिवसांपूर्वी व्हायरल झ ा ल ा होता. या व्हिडीओमध्ये अंकिताने रिंकू आणि जिग्नाला तिला आंबट पदार्थ खाण्याची इच्छा होत असल्याचं सांगितलं होतं. तसेच मळमळ होत असल्याचंही ती म्हणाली होती. अंकिताच्या या बोलण्यावर रिंकू आणि जिग्नाने तिला चिडवलं होतं. त्यानंतर अभिनेत्री विकीसोबत प्रेग्नंसीबाबत बोलताना दिसून आली होती.

# विल्यम्सनचे विक्रमी 29 वे शतक

## मायकेल क्लार्क आणि हाशिम आमला यांना मागे टाकले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यम्सनने शानदार शतक झळकावून धमाका केला. हे त्याचे कसोटी कारकिर्दीतील 29 वे शतक ठरले. येथील पहिल्या कसोटी सामन्यात बांगलादेशने पहिल्या डावात सर्वबाद 310 धावांचा डोंगर रचल्यानंतर प्रत्युत्तरात न्यूझीलंडने बुधवारी दुसऱ्या दिवसअखेर 8 बाद 266 धावांपर्यंत मजल मारली. केन विल्यम्सनने यावेळी 205 चेंडूत 11 चौकारांसह 104 धावांचे योगदान दिले.**

या सामन्यात किवी संघाला सातत्याने धक्के बसत गेले. पण विल्यमसनने एक बाजू सांभाळत खेळपट्टीवर जणू पाया रोवला आणि 189 चेंडूत आपले शतक पूर्ण केले. या संयमी खेळीदरम्यान त्याने अनेक विक्रमही आपल्या नावावर केले. न्यूझीलंडचे दोन्ही सलामीवीर 44 धावांवर बाद झाले. अशा स्थितीत तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या विल्यम्सनने संयम व आक्रमणाचा उत्तम मिलाफ साधला. त्याने आपल्या शानदार खेळीत 11 चौकार मारले आणि यावेळी त्याचा स्ट्राईक रेट 50 पेक्षा जास्त होता. त्याने हेन्री निकोल्ससोबत 54 , तसेच डॅरिल मिशेलसोबत 66 धावा जोडल्या. तसेच ग्लेन फिलिप्ससोबत 50 हून अधिक धावांची भागीदारीही केली. विल्यम्सनच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये 29 शतके जमा झाली आहेत. यासह त्याने मायकेल क्लार्क (28) आणि हाशिम आमला (28) यांना मागे टाकले तर ऑस्ट्रेलियाचे माजी दिग्गज फलंदाज डॉन ब्रॅडमन (29) आणि टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली (29*)



यांची बरोबरी केली आहे. तूर्तास, कसोटी क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकरच्या नावावर कसोटीत सर्वाधिक (51) शतके आहेत. विल्यम्सनने सलग चौथ्या कसोटीत 100 पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. त्याने फेब्रुवारीमध्ये इंग्लंडविरुद्ध 132 धावांची इनिंग खेळली होती. यानंतर त्याने मार्चमध्ये श्रीलंकेविरुद्ध 121 आणि 215 धावा केल्या होत्या आणि आता त्याने बांगलादेशविरुद्ध शतक ठोकले आहे. तसेच सलग 3 कसोटीत शतके झळकावणारा तो किवी संघाचा पहिला फलंदाज ठरला आहे. विल्यमसन हा न्यूझीलंडसाठी कसोटीमध्ये सर्वाधिक शतके आणि सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. घेतलेला रॉस टेलर आहे, ज्याच्या नावावर कसोटी कारकिर्दीत 19 शतके आहेत. तिसऱ्या स्थानावर माजी किवी फलंदाज मार्टिन क्रो आहे. त्याने 17 कसोटी शतके झळकावली आहेत. विल्यमसनने आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिला सामना 2010 मध्ये भारताविरुद्ध खेळला. त्याने आपल्या संघासाठी 95 सामने खेळले आहेत आणि 165 डावांमध्ये 55 पेक्षा जास्त सरासरीने 8,000 हून अधिक धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने 6 द्विशतके, 29 शतके, 33 अर्धशतके झळकावली आहेत. त्याची सर्वोत्तम धावसंख्या 251 आहे, जी त्याने भारताविरुद्ध साकारली होती. बांगलादेश पहिला डाव : सर्वबाद 310. न्यूझीलंड पहिला डाव : 84 षटकात 8 बाद 266. (केन विल्यम्सन 205 चेंडूत 104, ग्लेन फिलीप्स 42. तैजूल इस्लाम 30 षटकात 89 धावात 4 बळी, शोरिफूल, मेहदी, नईम हसन, मोमिनूल प्रत्येकी 1 बळी)

### विल्यमसनची कसोटी कारकीर्द

» विल्यमसनने आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिला सामना 2010 मध्ये भारताविरुद्ध खेळला. त्याने आपल्या संघासाठी 95 सामने खेळले आहेत आणि 165 डावांमध्ये 55 पेक्षा जास्त सरासरीने 8,000 हून अधिक धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने 6 द्विशतके, 29 शतके, 33 अर्धशतके झळकावली आहेत. त्याची सर्वोत्तम धावसंख्या 251 आहे, जी त्याने भारताविरुद्ध साकारली होती. विल्यमसन हा न्यूझीलंडसाठी कसोटीमध्ये सर्वाधिक शतके आणि सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याच्यानंतर निवृत्ती घेतलेला रॉस टेलर आहे, ज्याच्या नावावर कसोटी कारकिर्दीत 19 शतके आहेत. तिसऱ्या स्थानावर माजी किवी फलंदाज मार्टिन क्रो आहे. त्याने 17 कसोटी शतके झळकावली आहेत.

# विराट कोहली फक्त कसोटी सामने खेळणार!

## BCCI ला कळवला मोठा निर्णय! भारतीय संघात मोठा बदल होणार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विश्वचषकात सर्वाधिक धावा करणारा विराट कोहलीने भारताच्या दक्षिण आफ्रिका दौऱ्याआधीच एक मोठा निर्णय घेतला असल्याचे समजतेय. इंडियन एक्सप्रेसच्या माहितीनुसार विराट कोहलीने १० डिसेंबरपासून सुरु होणाऱ्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेआधी पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमधून ब्रेक घेणार असल्याचे सांगितले आहे. विराट कोहलीने बीसीसीआयला याबाबत कळवले आहे.**

दक्षिण आफ्रिका दौऱ्यात टीम इंडिया, तीन टी-20 आंतरराष्ट्रीय, तीन एकदिवसीय सामने आणि त्यानंतर दोन कसोटी सामने खेळणार आहे. टी २० सामने आणि एकदिवसीय सामने खेळणार नसल्याचे कोहलीने स्पष्ट केले असले तरी यात कसोटी



सामन्यांबाबत भाष्य केलेले नाही त्यामुळे कदाचित कोहली कसोटी सामन्यांसाठी मैदानांत उतरू शकतो असे समजतेय. २६ डिसेंबरपासून भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. भारताचे माजी अष्टपैलू खेळाडू अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय निवड समिती येत्या काही दिवसांत तिन्ही फॉरमॅटसाठी भारतीय संघाची घोषणा करणार आहे. कोहलीने घरच्या मैदानावर शानदार विश्वचषक खेळला होता ज्यात त्याने ११ डावांमध्ये ७६५ धावा केल्या, ज्यात तीन शतकांचा समावेश होता. त्याला टूर्नामेंटचा सर्वोत्तम खेळाडू म्हणूनही गौरवण्यात आले. इंडियन एक्सप्रेसने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, "त्याने (कोहली) बीसीसीआय आणि निवडकर्त्यांना कळवले आहे की त्याला पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमधून विश्रांतीची आवश्यकता आहे आणि व्हाईट बॉल क्रिकेट खेळण्यासाठी तो कधी तयार होईल हे कळवण्यासाठी तो त्यांच्याशी संपर्क साधून कळवेल. या क्षणी त्याने बीसीसीआयला कळवले आहे की तो रेड-बॉल क्रिकेट खेळणार आहे, याचा अर्थ तो दक्षिण आफ्रिकेतील दोन कसोटी सामन्यांच्या संघात निवडीसाठी उपलब्ध आहे." प्राप्त माहितीनुसार, कोहली सध्या लंडनमध्ये सुट्टीवर आहे. गेल्या काही महिन्यांपासून तो सलग सामने खेळत आहे. शेवटच्या वेळी कोहलीने सप्टेंबरमध्ये विश्वचषकापूर्वी विश्रांती घेतली होती, कोहली व रोहित शर्माला ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर पहिल्या दोन वनडे सामन्यांमध्ये विश्रांती देण्यात आली होती. नुकत्याच संपलेल्या विश्वचषकात सर्वाधिक धावा करणारा किंग विराट कोहलीने दिलेल्या कडक निरोपामुळे बीसीसीआयची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. विराटने एकदिवसीय आणि टी-20 क्रिकेटमधून ब्रेक घेण्याच्या निर्णयाची माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) दिली आहे. त्यामुळे उद्या (30 नोव्हेंबर) टीम इंडियाची दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी घोषणा होणार आहे. यामध्ये कोहली आणि रोहितचा समावेश असणार की नाही? याकडे आता लक्ष आहे.

### कोहली सध्या लंडनमध्ये सुट्टीवर

» सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार "त्याने (कोहली) बीसीसीआय आणि निवड समितीला वनडेमधून विश्रांतीची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे. तसेच कधी खेळायचे आहे याबद्दल तो त्यांच्याशी नंतर संपर्क साधेल. कसोटी खेळणार असल्याचे त्याने कळवलं आहे. सोबत कसोटी खेळणार असल्याचे सांगितल्याने दक्षिण आफ्रिकेतील दोन कसोटी सामन्यांसाठी निवडीसाठी उपलब्ध आहे." पहिली कसोटी बॉक्सिंग डेला सेंच्युरियन येथे सुरू होईल आणि दुसरी कसोटी केपटाऊन येथे होईल. कोहली सध्या लंडनमध्ये सुट्टीवर आहे. गेल्या काही महिन्यांपासून तो नॉन-स्टॉप क्रिकेट खेळत आहे. शेवटच्या वेळी कोहलीने सप्टेंबरमध्ये विश्वचषकापूर्वी विश्रांती घेतली होती.